अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक
अशोक भैय्या
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरुवार, दि. 31 जुलै 2025 | वर्ष 10 वे | अंक 52 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# मोकाट जनावरे, भटकी कुत्री उठली नागरिकांच्या जीवावर

## अज्ञात वाहनाच्या धडकेत १ गाय ठार, २ जखमी

**मंगळवारी सकाळच्या सुमारास शहरातील लावण्या वस्त्र भंडार समोर अज्ञात वाहनाने रस्त्यावर बसलेल्या गायीच्या कळपाला चिराडल्याची घटना मंगळवारला उघडकीस आली. यात एका गायीचा मृत्यु झाला तर दोन गायी जखमी अवस्थेत होत्या. सदर बाब लक्षात येताच राजू भागवत यांनी नगरपालिका, पोलिस स्टेशन, पशू प्रेमी व डॉक्टर यांना पाचारण केले. डॉ. ठोंबरे व पशूप्रेमी तुषार काटेखाये, नाजूक बगमारे, संतू भांडारकर, अनिता भागवत, चंचल हलधर यांच्या सहकायनि वाचविण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते राजू भागवत यांनी नगरपालिकेला बेवारस गुरांवर व गुरांच्या मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यासंदर्भात दोनदा निवेदन देऊन सुद्धा अद्यापही नगर पालिकेने कुठलेच पाऊल उचलले नाही.त्यामुळे नगरपालिकेच्या कार्यप्रणालीवर आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**



ब्रह्मपुरी/का.प्र.

विदर्भाची शैक्षणिक नगरी म्हणून नावलौकिक प्राप्त केलेल्या ब्रह्मपुरी शहरातील नागरिकांना वेगवेगळ्या समस्येला दररोज तोंड द्यावे लागत आहे. मोकाट जनावरे आणि भटकी कुत्री अक्षरशः नागरिकांच्या जीवावर उठले आहेत. त्यांना प्रतिबंध घालणारी ब्रह्मपुरी नगरपालिकेची यंत्रणा झोपेत आहे का? असा संतापजनक सवाल नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे. मोकट जनावरे तसेच भटकी कुत्री यामुळे दररोज अपघात होत आहेत.

ब्रह्मपुरी शहरात मोकाट जनावरांचा आणि भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून रस्त्यावरील वाहन चालकाच्या डोक्यावर कायम अपघाताची टांगती तलवार असते. रस्त्यावर आपली गुरे ढोरे सोडून वाहतूक व नागरिकांना अडचण निर्माण करणाऱ्या मालकांविरुद्ध ब्रह्मपुरी नगरपालिकेने कडक कारवाई करण्याची गरज आहे. मात्र या समस्येपासून नागरिकांची सुटका करण्यात ब्रह्मपुरी नगरपालिका कोणतीच ठोस भूमिका घेत नसल्याने ब्रह्मपुरी नगरपालिका हतबल झाली की काय? असा प्रश्न सुज्ञ नागरिकांतून विचारला जात आहे.

शहरातील विविध रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ्या

(उर्वरित पान क्र. ५ वर)

# सरकारी कर्मचाऱ्यांना सोशल मिडीया वापरासाठी मार्गदर्शक सुचना जाहीर

### या कर्मचाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील अधिकारी आणि कर्मचारी, प्रतिनियुक्तीने तसेच करारपद्धतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेले अधिकारी, कर्मचाऱ्यांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच, स्थानिक स्वराज्य संस्था, मंडळे, महामंडळे आणि सार्वजनिक उपक्रमातील अधिकारी, कर्मचारी, प्रतिनियुक्तीने, करारपद्धतीने, बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनाही सदर नियमावली लागू असणार आहे.**

ब्रम्हपुरी/का.प्र.

सरकारी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडियाच्या वापराबाबत राज्य सरकारने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. राज्य शासनासह देशातील अन्य कोणत्याही सरकारच्या चालू किंवा अलीकडील धोरणावर, कृतीवर टीका करू नये; परवानगीशिवाय गोपनीय दस्तावेज, कागदपत्रे फॉरवर्ड करण्यास मनाई करण्यात आली आहे. सोबतच, आपल्या वैयक्तिक अकाऊंटवर शासकीय पदाचा, वर्दीचा किंवा शासकीय वाहन, इमारतीचे फोटो, रिल्स आणि व्हिडीओ अपलोड करणे टाळण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी, या मार्गदर्शक सूचना जारी केल्या. यासंदर्भात नियमभंग केल्यास संबंधित कर्मचारी कारवाईस पात्र ठरतो, असा इशारा परिपत्रकात देण्यात आला आहे.

सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करावा, वैयक्तिक आणि कार्यालयीन सोशल मीडिया खाते स्वतंत्र ठेवावेत. केंद्र आणि राज्याने बंदी घातलेल्या वेबसाईट, ॲप आदींचा वापर करू नये, वैयक्तिक अकाऊंटवर केवळ प्रोफाईल फोटो वगळता, आपल्या शासकीय पदनामाचा, लोगो, वर्दी तसेच वाहन, इमारतीसारख्या शासकीय मालमत्तेचे फोटो, रिल्स, व्हीडीओ अपलोड करणे टाळावे. आक्षेपार्ह, द्वेषमूलक, मानहानीकारक तसेच भेदभाव उत्पन्न होणारे मजकूर पोस्ट करू नये. अधिकार नसताना किंवा पूर्व मंजूरीशिवाय कोणतेही गोपनीय दस्तावेज, शासकीय तसेच कार्यालयीन कागदपत्रे, अंशतः तसेच पूर्ण स्वरूपात शेअर, अपलोड किंवा फॉरवर्ड करण्यासही मनाई करण्यात आली आहे.




## ०३ ऑगस्टला श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेचा उद्‌घाटन सोहळा

**ब्रह्मपुरी/का.प्र.**

**सर्वसामान्य जनता व व्यवसायीकांचा आर्थिक स्तर उंचाविला पाहिजे, त्यांना वेळोवेळी आवश्यक कर्जाचा पुरवठा झाला पाहिजे, तसेच छोट्या बचतीची सवय लावून त्यांची आर्थिक उन्नती साधण्याचे उदात्त ध्येय डोळ्यासमोर समोर ठेवून श्री. बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना करण्यात आली.**

**सदर श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेचा उद्‌घाटन सोहळा ०३ ऑगस्ट रविवारला सकाळी ११वाजता भैय्या कॉम्प्लेक्स, टॉवर १, वडसा रोड ब्रम्हपुरी येथे आयोजित करण्यात आला आहे. सदर उद्‌घाटन सोहळा कार्यक्रमाला उद्‌घाटक म्हणून डॉ.मिलींद नारोटे आमदार, गडचिरोली विधानसभा क्षेत्र हे राहणार आहेत. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वप्नील पाटील सहाय्यक निबंधक ब्रम्हपुरी, प्रा. सुभाष बजाज सदस्य, ने. हि. शिक्षण संस्था, ब्रम्हपुरी, योगेश मिसार अध्यक्ष, व्यापारी संघटना, ब्रम्हपुरी, सुभाष अग्रवाल उपाध्यक्ष, व्यापारी संघटना ब्रम्हपुरी आदी. मान्यवर उपस्थित राहणार आहेत.**

**तरी सदर सोहळयास आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन श्री बालाजी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अशोक भैय्या, उपाध्यक्ष निलेश मोहता व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.**

## संपादकीय...

# विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य

देशातील विविध शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या वाढत चाललेल्या आत्महत्यांची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी काही देशव्यापी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. सर्वोच्च न्यायालयाने सर्व शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जाणीवपूर्वक जपण्याचे निर्देशही दिले आहेत. गेल्या काही महिन्यांच्या कालावधीमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये विविध शिक्षण संस्था असोत किंवा खासगी शिकवणी केंद्र असो, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे हे निर्देश अतिशय महत्त्वाचे मानावे लागतील. केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आत्महत्या प्रतिबंधक धोरणाप्रमाणे 'मनोदर्पण' हा उपक्रम काही कालावधीपूर्वी सुरू करण्यात आला होता. या उपक्रमाअंतर्गत 'उम्मिद' या नावाने काही मार्गदर्शक तत्त्वेही तयार करण्यात आली होती. त्याच आधारे सर्वोच्च न्यायालयाने आपला हा निर्देश दिला असून सरकारने आपल्या धोरणाचा दरवर्षी फेरआढावा घेऊन त्यामध्ये परिस्थितीप्रमाणे योग्य बदल करावा, असेही सुचवले आहे.

सरकारतर्फे विविध शिक्षण संस्था किंवा खासगी शिक्षण केंद्रे यांच्यासाठी जोपर्यंत एखादे अशा प्रकारचे धोरण तयार होत नाही, तोपर्यंत न्यायालयाने आपली स्वतःची अशी मार्गदर्शक तत्त्वेही जाहीर केली आहेत. आधुनिक काळामध्ये विद्यार्थ्यांमध्येच केवळ स्पर्धात्मकता आहे असे नाही, तर शिक्षण संस्थांमध्ये आणि खासगी शिकवणी संस्थांमध्येसुद्धा स्पर्धात्मक वातावरण आहे. शिक्षण हा एक वेगळ्या प्रकारचा व्यवसाय झाला असल्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्याकडे केंद्रित करण्यासाठी शैक्षणिक संस्था किंवा खासगी शिक्षण केंद्रे मोठ मोठी आश्वासने देऊन आणि भली मोठी फी आकारून विद्यार्थ्यांना ॲडमिशन देतात. पण जेव्हा ती आश्वासने पूर्ण होत नाहीत किंवा आपण अपेक्षा पूर्ण करू शकत नाही, असे विद्यार्थ्यांच्या लक्षात येते तेव्हा अनेक वेळा विद्यार्थी आत्महत्येचा मार्ग पत्करतात. राजस्थानमधील शिक्षण प्रणालीचा एकेकाळी जरी मोठ्या प्रमाणात बोलबाला झाला असला, तरी गेल्या काही वर्षांपासून तेथे मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झाल्याने या वेगळ्या शैक्षणिक पॅटर्नबाबतही शंका निर्माण होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने जी आपली मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत ती सर्वसाधारणपणे प्रतिबंधात्मक आहेत. म्हणजे विद्यार्थ्यांचे मानसिक समुपदेशन करत असतानाच त्यांना सहजासहजी आत्महत्या करता येऊ नये, असे काही उपाय सर्वोच्च न्यायालयाने आपल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुचवले आहेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षण घेण्याच्या वयामध्ये विद्यार्थ्यांमध्ये डिप्रेशन वाढण्याचा धोका जास्त असतो. हे डिप्रेशन केवळ अपयशामुळे येते असे नाही तर ते तुलनेमुळेसुद्धा येते. जेव्हा एक कोणत्या शिक्षण संस्थेमध्ये किंवा शिक्षण केंद्रांमध्ये गुणवत्तेच्या आधारे विद्यार्थ्यांची विभागणी केली जाते किंवा वेगळ्या तुकड्या पाडल्या जातात तेव्हा कमी गुणवत्तेच्या विद्यार्थ्यांमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड तयार होतो. त्यातूनच डिप्रेशन वाढीला लागते, असेही सर्वोच्च न्यायालयाने सूचित केले आहे.

गुणवत्तेच्या आधारे शैक्षणिक संस्थांमध्ये तुकड्यांचे नियोजन केले जाऊ नये, हा एक महत्त्वाचा विषय या निमित्ताने अधोरेखित होत आहे. शिक्षणातील यश असो किंवा नंतर नोकरीतील यश असो प्रत्येकालाच त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागते. साहजिकच कोणाचेही वैयक्तिक मूल्यमापन त्याच्या यश किंवा अपयशावर न करता त्याने प्रामाणिकपणे घेतलेल्या परिश्रमावर करायला हवे हेच सर्वात महत्त्वाचे आहे. पालक जेव्हा लाखो रुपये फी भरून आपल्या पाल्याला एखाद्या संस्थेमध्ये ॲडमिशन घेतात, तेव्हाच त्याच्या मनामध्ये चांगले यश मिळवण्याचा दबाव तयार झालेला असतो. पालकांना अपेक्षित असे यश मिळाले नाही तर त्याला नैराश्य येते. त्यातूनच अनेक जण आत्महत्यासारखा मार्ग स्वीकारतात.

# ब्रम्हपुरी नगरी 'पावसाच्या कवितां'नी ओलीचिंब

## संमेलनात ७५ कवींचा प्रत्यक्ष सहभाग

ब्रह्मपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही ब्रह्मपुरी नगरी साहित्यरंगात न्हाऊन निघाली व पावसाच्या



कवितांनी ओलीचिंब झाली. निमित्त होते आविष्कार साहित्य मंच आणि मराठी वाङ्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पावसाच्या कविता' राज्यस्तरीय कविसंमेलनाचे. यात राज्यातील ७५ कविंनी आपल्या रचना सादर करुन रसिकांना अक्षरशः चिंब भिजवून मंत्रमुग्ध केले. यावेळी नेवजाबाई भैया हितकारिणी महाविद्यालयाचे स्व.हिरालालजी भैया सभागृह श्रोत्यांनी गच्च भरले होते.

या राज्यस्तरीय कविसंमेलनाचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योजक तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैयांच्या हस्ते झाले. 'ब्रह्मपुरी पुन्हा एकदा आपला साहित्यिक वारसा जपून तो पुढे नेत आहे' असे गौरवोद्गार त्यांनी काढले. मंचाचे अध्यक्ष मंगेश जनबंधूंनी आविष्कार साहित्य मंचाची गेली अनेक वर्षांपासून चालत आलेली साहित्यसेवा उलगडली. कविसंमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध साहित्यिक कवी डॉ.धनराज खानोरकरांनी अनोख्या आकर्षक शैलीत मनोगत मांडीत भावोत्कटता साधली. उपस्थितांना चिंब भिजवले. रसिकांनी उत्तम दाद दिली. ते संमेलन उंचीवर घेऊन गेले आणि शब्दांच्या सरींनी अंतरंग प्रफुल्लित झाले. त्यांनी 'तो असाच जातो बिलगून/ फुलवूनी मोरपिसारा/ हे मलाही समजत नाही/ का वरुन सांडती धारा?// 'ही कविता गाऊन पसंती मिळवली. विशेष उपस्थिती प्रसिद्ध कवी डॉ.नोमेश मेश्रामांनी कवितेवर सखोल भाष्य केले. अनेक समर्पक दाखले देत त्यांनी पावसाच्या छटा दर्शवणाऱ्या गझला सादर केल्या. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुभाष शेकोकरांनी अध्यक्षीय भाषणातून आविष्कार मंचाच्या सृजनशीलतेचे कौतुक केले. कवीसंमेलनाच्या प्रारंभापासून कवितांचा पाऊस अविरत बरसत राहिला. निमंत्रित कवींमध्ये प्रवीण आडेकर भद्रावती, संजय गोडघाटे नागपूर, गीता रायपूरे चंद्रपूर, प्रीती जगझाप बल्लारपूर, माणिक खोब्रागडे नागपूर, विनोद गहाणे अर्जुनी इ.कविंचा समावेश होता. त्यांच्या कवितांनी श्रोत्यांच्या मनावर गारुड केले. खुले कविसंमेलनात किशोर मल्लेवार, अंजू येवले, प्रभाकर दुर्गे, प्रियंका ठाकरे, नटराज गेडाम, डॉ. पद्माकर वानखडे, डॉ. प्रकाश वट्टी, गजानन माद्येश्वार, हरिदास गौतम, खेमदेव हस्ते, मनिषा गेडाम, उमराव नारनवरेंच्या कवितांनी रंग भरला.

कविसंमेलनाचे निवेदन ललित बोरकरांनी केले तर मंचाचे सचिव गौतम राऊतांनी उपस्थितांचे आभार मानले. यशस्वीतेसाठी मंगेश जनबंधू, सचिव गौतम राऊत, मंजुषा साखरकर, भिमानंद मेश्राम, भाविक सुखदेवे, छाया जांभुळे, वर्षा चौधरी, ज्योती नवघरे, शशी मदनकर, इंदु मुळे, सोनाली सहारे, चैतन्य मातुरकर, कल्पना सूर्यवंशी, मंगेश गोवर्धन, अशोक शामकुळे, हिराकांत निहटेंनी अथक परिश्रम घेतले.

# ब्रम्हपुरी भाजपा शहर कार्यकारिणीची घोषणा

## शहर सरचिटणीस पदी मनोज भुपाल व पवन जयस्वाल

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहर अध्यक्ष पदी नुकतीच प्रा. सुयोग बाळबुधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी ब्रम्हपुरी शहराची कार्यकारिणी जाहीर केली आहे.

यामध्ये भाजपा शहर सरचिटणीस पदी मनोज भूपाल व पवन जयस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा शहर उपाध्यक्ष पदी प्रशांत वसाके, संजय बावणकुळे, उत्तम उरकुडे, रेहमान पठाण, गीताताई जांभुळे, छायाताई वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे. तर शहर सचिव पदी मनीष पटेल, प्रकाश कूथे, अनवर शेख, पुष्पा गराडे, वर्षा जोशी, प्रतिभा भोयर, शहर कोषाध्यक्ष पदी प्रा. विनय दडमल यांना संधी देण्यात आली आहे. कार्यकारिणी सदस्य पदी इंजी. अरविंद नंदुरकर, मनोज वठे, विक्रम कावळे, साकेत भानारकर, जयप्रकाश अंडेलकर, डॉ. सतीश कावळे, विलास विखार, गौरव भैया, नितीन आंबोरकर, क्रीष्णा वैद्य, रितेश दशमवार, प्रमोद बांगरे, सागर हर्षे, अरविंद कुंभारे, राकेश वैद्य, सहदेव भानारकर, राकेश वेलथरे, संजय अंबोरकर, जगदीश भशाखेत्रे, सुधाकर ठेंगरी, दिलीप पिलारे, प्रमोद राऊत, लोकेश भर्रे, ईश्वर प्रधान, विनायक दुफारे, अशोक हटवार, रवी वानखेडे, रमेश नवघडे, राजेश उरकुडे, अभिजित बच्चूवार यांचेसह महिलांमधून डॉ. हेमलता नंदुरकर, विभा सुभेदार, नलिनी बगमारे, अर्चना बावनकुळे, रेखा कामडी, वर्षा सहारे, प्रियंका रोकडे, रुपाली चौधरी, सुनीता कावळे, लताताई गायकवाड, गीता गोन्नाडे, वैशाली कुंभारे, लता नाकतोडे, ललिता कामडी यांची निवड करण्यात आली.

### विनोदिनी

एका मॅनेजमेंट एक्सपर्टने आपली बायको आशावादी आहे की निराशावादी हे पाहण्यासाठी अर्धा भरलेला पाण्याचा ग्लास तिच्या समोर ठेवला व विचारले... ''ह्या ग्लासकडे पाहिल्यावर तुला काय वाटतं...???

तर ती म्हणाली, ''पाणी पिऊन झालं असेल तर ग्लास विसळून जागेवर ठेवा...!!

ना आशावादी, ना निराशावादी फक्त वादावादी..

# पालकांनी आपल्या मुलांबद्दल जागरूक राहणे ही काळाची गरज

## पालक-शिक्षक मेळाव्यात अशोक भैया यांचे प्रतिपादन

ब्रम्हपुरी/का.प्र.

‘विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी आपल्या मुलांबाबत अधिक सजग राहणे ही काळाची गरज आहे. तसेच विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी पालक-शिक्षक यांच्यातील सलग समन्वयाची गरज अधोरेखित केली. सध्याच्या डिजिटल युगात विद्यार्थी अनेक गोष्टींमध्ये गुंततात, अशा परिस्थितीत पालकांनी केवळ अभ्यासापुरते न राहता त्यांच्या मानसिक, भावनिक आरोग्यावरही लक्ष ठेवणे आवश्यक आहे,’ असे स्पष्ट मत नेवजाबाई भैय्या हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया यांनी व्यक्त केले. ते नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रम्हपुरी येथे दिनांक २५ जुलै २०२५ रोजी आयोजित पालक-शिक्षक मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात बोलत होते.



प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक के.एम. नाईक सर, उपमुख्याध्यापक एन.डब्ल्यू. नाकाडे सर आणि पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जिभकाटे सर मंचावर उपस्थित होते. पालकांचा उत्स्फूर्त सहभाग हे या मेळाव्याचे खास वैशिष्ट्य ठरले.

कार्यक्रमाची सुरुवात पालक-शिक्षक समितीच्या नव्या कार्यकारिणी निवडीने झाली. त्यात अध्यक्ष मुख्याध्यापक के. एम. नाईक सर, उपाध्यक्ष विजयजी बनपुरकर (माजी नगरसेवक), महिला प्रतिनिधी रजनीगंधा मेंढे, सचिव पदी कु. कलकोटवार मॅडम, सहसचिव म्हणून निशिकांत बोरकर सर यांची निवड करण्यात आली. त्यानंतर बारापात्रे सरांनी मागील वर्षाच्या पालकसभेचे इतिवृत्त सादर केले. मेळाव्यात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि कौटुंबिक अडचणींवर सखोल चर्चा झाली. पालकांनी आपल्या अनुभवातून समस्या मांडल्या, तर शिक्षकांनी त्या प्रश्नांवर समर्पक उत्तरं देऊन समन्वयाचे सुंदर उदाहरण घालून दिले. मुख्याध्यापक नाईक सरांनी विद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत पालकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेच्या प्रयत्नांची कल्पना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कलकोटवार मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन श्री. बोरकर सर यांनी केले. हा मेळावा शाळा, पालक आणि संस्था यामधील संबंध दृढ करण्यास मदत करणारा ठरला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी असे संवादात्मक उपक्रम अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सर्व उपस्थितांनी मान्य केले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा ‘जन विश्वास सप्ताह साजरा

ब्रह्मपुरी/का.प्र.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून २२ जुलै २०२५ ते ३० जुलै २०२५ पर्यंत ‘जनविश्वास सप्ताह’ आयोजित करण्यात आला.

जन् विश्वास सप्ताहाच्या माध्यमातून ब्रह्मपुरी तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तर्फे विविध उपक्रम हाती घेतले असून ‘हरित महाराष्ट्र’ ‘झाड माझी सावली.. झाड माझी माऊली’या उपक्रमांतर्गत चंद्रपूर जिल्हा ओबीसी ग्रामीण विभाग जिल्हाध्यक्ष अविनाश राऊत यांच्या पुढाकारातून पेठ वार्ड ब्रह्मपुरी येथील शाळा क्रमांक (२) विद्यार्थ्यांना पेन नोटबुक वितरण सोहळा व बिस्किट वाटप कार्यक्रम घेण्यात आला. बोळेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पटांगणामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. व शालेय विद्यार्थ्यांशी हितगुंज करीत बिस्किटे,पेन, नोटबुकचे वितरण करण्यात आले. मंगळवारी सकाळी ब्रह्मपुरी उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात जाऊन रुग्णांना बिस्किटे व फळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला. ब्रह्मपुरी तालुक्यातील वेगवेगळ्या शाळा अंगणवाड्यामध्ये भेटी देऊन वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले.

याप्रसंगी किशोर भाऊ भोयर जिल्हा उपाध्यक्ष राकाँपा, गिरीधर गुरपुडे जिल्हा महासचिव ओबीसी विभाग, विनोद दोनाडकर जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, मनोज कऱ्हाडे माजी तालुका अध्यक्ष सामाजिक न्याय, मंगेश फटिंग युवक तालुका अध्यक्ष, नानाजी बागडे, तिलकजी तिघरे, देवा गोन्नाडे, शेखर गडे, संजय नन्नावरे, सचिन मेश्राम, प्रकाश अंबादे, प्रशांत उपासे, बोढेगाव येथील शाव्यस अध्यक्ष कृष्णा ढोंगे व गांवकरी उपस्थित होते.

## एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये लो. टिळक व चंद्रशेखर आझाद जयंती



ब्रम्हपुरी/का.प्र.

एल.एम.बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे बुधवार, दिनांक २३ जुलै २०२५ ला लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीच्या कार्यकम पार पडला.

शाळेच्या वतीने प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. याप्रसंगी शाळेच्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात प्रविर आलोककुमार लांजेवार आणि श्रीयांश योगेश ठावरी या विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळक व चंद्रशेखर आझाद यांची वेशभूषा धारण करून थोडक्यात त्यांच्या जीवन परिचयावर प्रकाश टाकला. ‘स्वराज हा माझा जन्म सिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ या त्यांच्या नाऱ्यातून स्वातंत्र्याविषयीची तळमळ विद्यार्थांमध्ये जागृत झाली.

कार्यक्रमाचे संचालन अशाज अश्फाक मोहम्मद या विद्यार्थ्यांनी केले. या प्रसंगी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ने.हि. विद्यालय, नवेगांव पांडवच्या विद्यार्थ्यांचा युपीएससी उत्तीर्ण गुणवंतांशी संवाद



नागभीड/प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील नेवजाबाई हितकारिणी विद्यालय नवेगाव पांडव हे विद्यामंदिर ग्रामीण भागात असूनही येथील विद्यार्थांनी युपीएससी परीक्षा २०२५ मध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये आयोजित सत्कार सोहळयास हजेरी लाऊन थेट संवाद साधला.

अधिकारी बनायचे ध्येय उरी बाळगत नाना तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांनी आपल्या शंका दूर केल्या. सदर सत्कार सोहळ्याचे अध्यक्ष डॉ. नरेशचंद्र काटोले साहेब संचालक मिशन आयएएस अमरावती हे होते. विद्यार्थ्यांसोबत चर्चेत सहभागी मुनिराज कुथे सर विभागीय संचालक मिशन आयएएस ब्रम्हपुरी, मनोज हेमके सर व शिवदास बुले सर होते. विद्यार्थ्यांनी अधिकारी बनण्याचा कानमंत्र घेत आपणही अधिकारी बनणार असे स्वत:ला आश्वस्त केले.

## रस्ते सुरक्षा जनजागृतीपर कार्यक्रम

नागभीड/प्रतिनिधी

नागभीड तालुक्यातील तळोधी (बा.) येथील महात्मा फुले विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार, दि.२३ जुलै रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाच्या वतीने रस्ते सुरक्षा अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षेबद्दल जागरूकता वाढविणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहन चालविण्याच्या नियमांची माहिती, अपघातांची कारणे, त्याचे दुष्परिणाम याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक जी.जे. बुलबुले, उपमुख्याध्यापक कोराने, पर्यवेक्षक कोहपरे उपस्थित होते.

# माजी आम. प्रा. देशकर यांच्या वाढदिवसानिमित्य भव्य कार्यकर्ता मेळावा

ब्रम्हपुरी/का.प्र.

भाजपा नेते व ब्रह्मपुरी विधानसभेचे माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी ब्रह्मपुरी शहर व तालुक्याच्या वतीने भव्य कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन येथील विठ्ठल रुक्मिणी सभागृहात करण्यात आले होते. या मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून माजी खासदार तथा भाजपाचे अनु. जमातीचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. अशोकभाऊ नेते व भाजपा चंद्रपूर जिल्ह्याचे अध्यक्ष हरीशजी शर्मा उपस्थित होते. ब्रह्मपुरी तालुक्यातील व शहरातील हजारो कार्यकर्त्यांनी या




मेळाव्याला उपस्थित राहून माजी आमदार प्रा. अतुलभाऊ देशकर यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी कार्यकर्त्यांना संबोधित करतांना उत्सव मूर्ती भाजपा नेते प्रा. अतुलभाऊ देशकर यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले. सोबतच माझ्यावर जितक प्रेम करता त्याहून जास्त पक्षावर प्रेम करा असे प्रतिपादन करत प्रा. अतुलभाऊ देशकर यांनी आपल्या संघटनशील वृत्तीचे पुन्हा एकदा दर्शन दिले.

यावेळी भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश परिषदेत जेष्ठ नेते प्रा. कादर शेख सर यांच्या नियुक्तीबद्दल सत्कार करण्यात आला व नव नियुक्त शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे व तालुका मंडळ अध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे यांच्यासह कार्यकारिणीतील पदाधिकारी व सदस्यांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. सोबतच मावळते शहर व तालुका अध्यक्ष अरविंद नंदूरकर व प्राचार्य अरुण शेंडे सोबतच मावळते तालुका व शहर सरचिटणीस मनोज वठे व गोपाल कावळे यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी ब्रह्मपुरी शहरातील अनेक युवा, महिला व मान्यवरांनी मोठ्या संख्येने भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला. सन्मित्र क्रीडा मंडळ व महाराष्ट्र बास्केटबॉल फेडरेशनच्या वतीने उत्सवमूर्ती प्रा. अतुलभाऊ देशकर यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले.

यावेळी मंचावर भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा वंदनाताई शेंडे, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे, माजी जि.प. उपाध्यक्ष कृष्णा सहारे, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर दिवटे, प्राचार्य अरुण शेंडे, अरविंद नंदूरकर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मनोज भुपाल यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. रामलाल दोनाडकर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नवनियुक्त शहर अध्यक्ष प्रा. सुयोग बाळबुधे यांनी केले.

# महाज्योती संस्थेला भरीव निधी द्यावा - प्रा. प्रकाश बगमारे

ब्रम्हपुरी/का.प्र.

अनुसूचित जातीसाठी बार्टी, मराठा समाजासाठी सारथी, आदिवासी समाजासाठी टीआरटीआय तसेच ओबीसी साठी महाज्योती अशा विविध संस्था कार्यरत आहेत. या संस्थांना सरकारतर्फे संशोधन व प्रशिक्षणासाठी निधी मंजूर केला जातो.

महाज्योती या ओबीसी बांधवांच्या संस्थेला लोकसंख्येच्या प्रमाणात अतिरिक्त निधी गरजेचा आहे परंतु सरकारकडून नेहमी ओबीसीसाठी असलेल्या या संस्थेच्या निधीकडे दुर्लक्ष केले जाते ही अत्यंत गंभीर बाब आहे. म्हणून ओबीसी समाजातील विविध घटकांना प्रशिक्षण आणि इतर सहाय्य यासाठी महाज्योतीला जास्तीत जास्त निधी देण्यात यावे आणि महाज्योती संस्थेला अधिक परिणामकारक करून कार्यक्षमपणे कार्यात वाढ करणे अत्यावश्यक आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, परदेशी शिक्षणासाठी मार्गदर्शन ,संशोधन, शिष्यवृत्ती आणि विविध उपक्रम महाज्योतीमार्फत राबविले जातात. या संस्थेला पुरेशा प्रमाणात निधी मिळाल्यास उपेक्षित असलेल्या ओबीसी घटकापर्यंत मदतीचा ओघ जाऊ शकतो. म्हणून सरकारने ओबीसींची संख्या लक्षात घेता त्यांना त्या प्रमाणात जास्तीत जास्त निधीची तरतूद करावी, अशी विनंती वजा मागणी भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव प्रा. प्रकाश बगमारे यांनी केली आहे.

# संगीताच्या जादुई दुनियेत करिअरच्या वाटा



नागभीड/प्रतिनिधी

पूर्व विदर्भातील ख्यातनाम नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था ब्रम्हपुरी, द्वारा चालवल्या जाणाऱ्या नेवजाबाई हितकारिणी विद्यालय, नवेगाव पांडव येथील ग्रामीण विद्यार्थ्यांना सुद्धा म्युझिक क्षेत्रात आपलं कॅरिअर करता येते हे, दाखवून देण्यासाठी एका आगळ्या वेगळ्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यशालेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. भावनाताई ढाबरे, म्युझिशियन इव्हेंट मॅनेजर ऑफ सोनू निगम, महम्मद रफी म्युझिक, मुंबई तथा मनोज ढाबरे IRS GST कमिशनर भारत सरकार, मुंबई यांच्या धर्मापत्नी यांनी विद्यार्थ्यांना म्युझिक दुनियेत घेऊन जाऊन प्रेरित केले. विद्यार्थ्यांना संगीत क्षेत्रात संधी मिळून देण्यासाठी आश्वासित केले. म्युसिक क्षेत्रात आपल्या भागातीलही मुले गेली पाहिजे यासाठी ड्रीम प्रोजेक्ट रबविणार, असल्याचे सांगितले. गाणे कसे गाईल पाहिजे याच प्रत्यक्षित करून दाखवलं व सर्व विद्यार्थ्यांना भारावून सोडलं. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही.सी. भैया सर होते. प्रमुख उपस्थितीत गीतांजली नगराळे, निपाने सर, चुन्हे सर, कुथे सर, डांगे सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन शिवदास बुल्ले यांनी तर आभार प्रदर्शन कु.मने मॅडम यांनी केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक वृंद तथा विद्यार्थी उपस्थित होते.

# ने.हि. महाविद्यालयात स्वयंम पोर्टलवर कार्यशाळा

ब्रम्हपुरी/का.प्र.

विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल शिक्षण प्लॅटफॉर्मबद्दल




जागरूकता निर्माण करण्यासाठी एन. एच. कॉलेज, ब्रम्हपुरी येथे ऑनलाइन शैक्षणिक पोर्टल स्वयंम या विषयावर सेमिनार आयोजित करण्यात आला होता. संसाधन व्यक्ती सहाय्यक प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग, डॉ. किशोर नाकतोडे यांनी स्वयंम पोर्टलची वैशिष्ट्ये, फायदे आणि नोंदणी प्रक्रिया यावर सादरीकरण केले. त्यांनी हे प्लॅटफॉर्म भारतातील प्रतिष्ठित संस्थांमधील दर्जेदार अभ्यासक्रमांपर्यंत कसे प्रवेश देते, विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक आणि व्यावसायिक कौशल्य वाढविण्यास मदत करते याबद्दल सचित्र माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य, डॉ. एस. एम. शेकोकर, ने. ही. महाविद्यालय, ब्रम्हपुरी यांनी आजच्या विकसित होत असलेल्या शैक्षणिक परिदृश्यात ऑनलाइन शिक्षणाची भूमिका अधोरेखित केली. कार्यक्रमाचे निमंत्रक डॉ. अतुल येरपुडे यांनी सेमिनार प्रभावीपणे व्यवस्थापित केला आणि उत्साही सहभाग सुनिश्चित केला. सुमारे सत्तर विद्यार्थ्यांनी सेमिनारला हजेरी लावली. त्यापैकी अनेकांनी स्वयंम अभ्यासक्रमांसाठी नोंदणी केली. संचालन व आभार प्रदर्शन डॉ. अतुल येरपुडे यांनी केले.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...

: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी

: जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३१००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७१५३१५

# नागभीड-सुलेझरी मार्गावरील रेल्वे क्रॉसिंग खड्डेमुक्त

नागभीड/का.प्र.

येथील नागभीड-सुलेझरी मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळ दीर्घकाळापासून पडलेले मोठे खड्डे अखेर भरून काढण्यात आले. नगर परिषद नागभीड आणि लोटस डायनॅमिक्स युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गिट्टी टाकून रस्ता खड्डेमुक्त करण्यात आला. लोटस डायनॅमिक्स युथ फाउंडेशनच्या पुढाकारामुळे आणि नगर परिषदेच्या सहकार्यामुळे हा प्रश्न सुटला आहे. उपक्रमात न. प.चे कर्मचारी तसेच प्रियंका कोरे, पराग गुंडेवार, हुमेश अमृतकर, रोहीत चौधरी, रीतेश गोडे, रित्विक मेश्राम, तेजस सोनटक्के, विजय दैवलकर, साहिल अमृतकर, भूशन नारनवरे, विपुल आंबोरकर यांचा सक्रिय सहभाग होता.

# ब्रम्हपुरीत धरणे आंदोलनात जनसुरक्षा विधेयकाची प्रतिकात्मक होळी

ब्रह्मपुरी/का.प्र.

जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणाऱ्या जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात जनसुरक्षा विधेयक विरोधी संघर्ष समिती ब्रह्मपुरीच्या वतीने २५ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकात धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात पत्रकार, वकील, शिक्षक, योजना कर्मचारी, शेतकरी, युवक यांच्यासह बहुजन समाजातील विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपस्थित मान्यवरांनी जनसुरक्षा विधेयक हा कायदा जनतेच्या सुरक्षेसाठी नसून सत्ताधाऱ्यांच्या हितासाठी असल्याचे स्पष्टपणे सांगितले.

या कायद्यामुळे सरकारविरोधात आवाज उठवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला अर्बन नक्षली ठरवण्याचा धोका निर्माण झाला आहे. या संज्ञेची कोणतीही स्पष्ट व्याख्या विधेयकात नसल्याने शिक्षकांनी मागणी केली, वकिलांनी मत मांडले, पत्रकारांनी सत्य लिहिले, शेतकऱ्यांनी व कामगारांनी मोर्चा काढला तर त्यांनाही देशद्रोही ठरवले जाऊ शकते. त्यामुळे हा कायदा लोकशाहीला संपवणारा, भीतीदायक आणि जनविरोधी असल्याची तीव्र प्रतिक्रिया आंदोलकांनी व्यक्त केली.

धरणे आंदोलनात मान्यवरांनी महापुरुषांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विचारमंथन केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रेमलाल मेश्राम, विनोद झोडगे, लिलाधर वंजारी, जगदिश पिलारे, संतोष रामटेके, जीवन बागडे, मिलिंद रंगारी, सुधाकर पोपटे, संजय वाळके, डॉ. महेश कोपुलवार, स्वप्निल राऊत, राजेश माटे, प्रभू लोखंडे, डी.एम. रामटेके, डेविड शेंडे, हरिश्चंद्र चोले, आर.बी. मेश्राम, वर्षा घुमे, प्रतिभा डांगे यांसारख्या समाजभान असलेल्या नेत्यांनी मार्गदर्शन करताना जनतेला एकत्र येण्याचे आवाहन केले. यानंतर विधेयकाची प्रतीकात्मक होळी करण्यात आली आणि 'असा कसा हटत नाही, हटल्याशिवाय राहत नाही!', 'जनसुरक्षा नव्हे, जनविरोधी कायदा!' यांसारख्या घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनानंतर उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यामार्फत मा.राज्यपाल यांना निवेदन सादर करण्यात आले. तसेच येत्या ०८ ऑगस्ट रोजी हुतात्मा स्मारक ते तहसील कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात येणार असून, सर्व सामाजिक संघटनांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. विधेयक रद्द झाल्याशिवाय थांबणार नसल्याचा निर्धार यावेळी आंदोलकांनी केला.



## आंदोलकांवर गुन्हा दाखल

**महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम बिल क्र. ३३, २०२४ रद्द करण्याच्या मागणीकरीता धरणे आंदोलन सुरू असतांना, सार्वजनिक शांततेचा भंग होणार नाही व कोणत्याही कलमांचे उल्लंघन होणार नाही, असे जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश असतांना आंदोलनातील पदाधिकाऱ्यांनी जनसुरक्षा विधेयकाची होळी केली. त्यामुळे ब्रम्हपुरी पोलिसांनी आंदोलनातील पदाधिकारी विनोद झोडगे, मोंटू पिलारे, लिलाधर वंजारी, प्रेमलाल मेश्राम व त्यांचे सहकारी यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम १६८, २३३ सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल केला आहे.**

# एफडीपी अंतर्गत प्रशासकीय कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्राचे वितरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात प्रशासकीय कर्मचारींकरीता



'प्रशासकीय कर्मचा-यांचा विकास आणि नॅक मूल्यांकन' यावर सात दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयातर्फे करण्यात आले. यात सर्व कर्मचाऱ्यांनी हिरहिरिने सहभाग घेऊन आपले मत नोंदविले.

या सात दिवसीय कार्यशाळेच्या समारोपाप्रसंगी महाविद्यालयाचे कार्य. प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर,अधीक्षक संगीता ठाकरे, आयोजक डॉ. रतन मेश्राम, नॅक समन्वयक डॉ. किशोर नाकतोडे, संयोजक डॉ. युवराज मेश्राम इ. मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. रुपेश वाकोडीकर, रुपेश चामलाटे, प्रज्ञा मेश्राम, रोशन डांगे, शशिकांत माडे, अक्षय चहांदे, राजू मेश्राम, आलोक मेश्राम, विनय भागडकर, प्रदीप रामटेकेंनी मोलांचे सहकार्य केले.

# ब्रम्हपुरी पोलिसांच्या जुगार अड्ड्यांवर धाडी

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील पोलीस उपनिरीक्षक श्रीनाथ गिरम व पोलीस स्टाप यांना २६ जुलै २०२५ रोजी तालुक्यातील पिंपळगाव (भोसले), नांदगाव (जानी) व उदापूर येथे जुगार अड्डयावर पोलिसांनी धाड टाकली असता नांदगाव (जानी) येथील ६ ईसम जुगार खेळताना पकडण्यात आले. त्यांच्याकडून नगदी पैसे व जुगार चे साहित्य असा एकूण १६,५७० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला तर पिंपळगाव (भोसले) येथील ४ इसम सार्वजनिक जागेवर जुगार खेळताना मिळून आले. त्यांच्याकडून नगदी पैसे व जुगाराचे साहित्य मिळून २,०४० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यासोबतच २७ जुलै २०२५ रोजी उदापूर येथील सार्वजनिक जागेवर जुगार खेळतांना ५ इसम पकडण्यात आले. त्यांच्याकडून नगदी पैसे व जुगाराचे साहित्य असे एकूण १,५८० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई एसडीपीओ दिनकर ठोसरे, पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

**... QUOTES ...**

"Man needs his difficulties because they are neccessary to enjoy success."
- Dr. APJ Abdul Kalam

**चा रो ळी**

दवा-दारूच्या ऑफर डोजमुळे
कधी रिॲक्शन होते...
रिॲक्शनसाठी पुन्हा, दवादारू घ्या,
त्वरीत ॲक्शन होते...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# मोकाट जनावरे, भटकी कुत्री...

(पान क्र. १ वरून)

प्रमाणात मोकाट जनावरे कळपा कळपाने फिरत आहेत. रस्त्याच्या मध्यभागी थांबून रस्त्यावरच आपला ठिय्या मांडत आहेत. त्यामुळे रहदारीस मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे. काही रस्त्यावरील दुभाजकावर ठिय्या मांडून बसतात आणि अचानक पणे हे मोकाट जनावरे रस्ता ओलांडत असल्याने, वाहनधारकांचे अपघात होत आहेत. जनावरे ठिय्या मांडून बसत असल्याने वाहतूक कोंडीचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे नागरिक संतापले आहेत. ख्रिस्तानंद चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुजरी वार्ड, रेल्वे स्टेशन रोड आदि वर्दळीच्या मार्गावर या मोकाट जनावरांचे वास्तव्य वाढले आहे. या ठिकाणी रस्त्यात बसलेली जनावरे आणि भटके कुत्रे रात्रीच्या वेळी डोकेदुखीच ठरत आहे.

गुरे ढोरे यांचा कळप असल्याने त्यांना हुसकावणे कठीण जाते वाहनचालकांना अर्ध्याच रस्त्याचा वापर करीत ये जा करावी लागत असल्याने अपघात झाले आहेत. त्याचप्रमाणे शहरातील अनेक चौकात भटक्या कुत्र्यांचा प्रचंड उपद्रव नागरिकांना सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी कामावरून येणारे नागरिकांच्या वाहनांच्या मागे हे कुत्रे पाठलाग करतात. बहुतांशी वेळा हे कुत्रे अंगावर धावून आल्याच्या घटना घडल्या आहेत. शहरात गेल्या अनेक दिवसांपासून मोकाट जनावरांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. या मोकाट जनावरांचा ब्रह्मपुरी नगरपालिकेने कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिक सातत्याने करीत आहेत, मात्र ब्रह्मपुरी नगरपालिकेच्या उदासीनतेमुळे ही मोकाट जनावरे पुन्हा रस्त्यावरील वाहतुकीस अडथळात ठरत आहेत. मोकाट जनावरे शहरात धुडगूस घालत असताना त्यांना प्रतिबंध घालण्यासाठीची यंत्रणा काय करते? असा सवाल देखील नागरिकांनी उपस्थित केला आहे. मोकाट जनावरे नागरिकांच्या जीवावर उठले असताना देखील त्यांना प्रतिबंध का घातला जात नाही? हा खरा सवाल आहे.

N.B.H. Education Society's

**NEVJABAI HITKARINI COLLEGE**

BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (Ph.No. 272033 & 273293) (M.S.)

(Estd. 1962 & NAAC Re-accredited "B++' Grade (CGPA 2.87)

## Wanted Clock Hour Basis (CHB) Teachers

(For UG Level Grant Basis For Session 2025-26)

**Walk-in-Interview**

As per Permission of Hon. J D Letter No. उशिनाग/पदमा/सीएचबी/ना.ह.प्र./1945375/2025 &, vide Permission of Gondwana University letter No. गो.वि./म.वि.वि.वि.वि./६८६/२०२५ दि. १९/०६/२०२५. The qualifications and teaching remuneration shall be as per the terms and conditions laid down in GR Govt. of Maharashtra No. अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दिनांक २७ मार्च २०२३.

| S.N. | Subject | No. of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1 | Commerce | 02 | Dt. 04/08/2025 at 11.00 am |

(For MCVC (Grant-in-aid-courses) For Session 2025-26)

**Walk-in-Interview**

| SN | SUBJECT | No. of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1 | English | 01 | Dt. 04/08/2025 at 11.00 am |
| 2 | Marathi | 01 | |
| 3 | General Foundation Course | 01 | |
| 4 | Construction Technology | 02 | |
| 5 | Marketing and Retail Management | 02 | |
| 6 | Fisheries Technology | 02 | |

The qualificaton and teaching remuneration shall be as per the terms and conditions lail down in GR Govt. of Maharashtra.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Warden for Girls Hostel (Women) | Post 1 | Dt. 04/08/2025 at 11.00 am |

Attend the Personal interview at your own cost along with original and two sets of Xerox copies of Marklists and Certificates on Said date at 11.00 a.m. in the office of the Principal, N.H.College, Bramhapuri, Dist.- Chandrapur.

Smt. Snehalatabai K. Bhaiya
President

Shri. Ashok K. Bhaiya
Secretary

Dr. S.M. Shekokar
Off. Principal


Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.

# लोकमान्य टिळक हे प्रखर देशभक्त - प्राचार्य डॉ. शेकोकर

ब्रह्मपुरी/का.प्र.

'भारतीय असंतोषाचे जनक म्हणून ज्यांना ओळखले जाते ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच! असे म्हणतांना त्यांची प्रखर राष्ट्रनिष्ठा यातून आपल्याला कळते. स्वराज्यासाठी जीवाचे रान करुन टिळकांनी तुरुंगवास भोगला, असे प्रखर देशभक्त लोकमान्य टिळक होते' असे विचार कार्य.प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकरांनी काढले.ते ने.हि.महाविद्यालयात आयोजित लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. शेकोकर व अधीक्षक संगीता ठाकरेंनी प्रतिमेला माल्यार्पण करुन करण्यात आली. त्यानंतर डॉ. रेखा मेश्राम, डॉ. धनराज खानोरकर, डॉ. असलम शेख, डॉ. मोहन कापगते, डॉ. रतन मेश्राम, डॉ. युवराज मेश्राम, डॉ. योगेश ठावरी, डॉ. भास्कर लेनगुरे, डॉ. प्रकाश वट्टी, डॉ. पद्माकर वानखडे, हर्षा कानफाडे, डॉ. वर्षा चंदनशिवे, प्रा. निलिमा रंगारी, प्रा. जयेश हजारे, प्रा. धिरज आतला, पर्यवेक्षक प्रा. आनंद भोयर, डॉ. राहुल मोहूर्ले, प्रा. प्रफुल्ल पराते, प्रा. परकरवार, रोशन डांगे, जयंत महाजन, सुषमा राऊत, प्रज्ञा मेश्राम इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. युवराज मेश्राम यांनी केले.

# एलएमबी पब्लिक स्कुलचे मैदानी स्पर्धेत घवघवीत यश




ब्रम्हपुरी/का.प्र.

क्रिडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर द्वारा विभागीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत ब्रम्हपुरी येथील एलएमबी पब्लिक स्कुलच्या १५ वर्ष वयोगटातील मुलांनी मैदानी स्पर्धेत विभागीय स्तरावर भाग घेत व्दितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

विभागीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा दि. २३ जुलै २०२५ रोजी नागपुर येथे आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी व्दितीय स्थानी राहत शाळेचे नाव नागपूर विभागात चमकविले आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे अध्यक्ष तथा ने. हि. शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांचेसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांना क्रिडा शिक्षक विशाल सर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404